दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे




बीड/महाराष्ट्र ● गुरुवार दि.१३ मार्च २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१३६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार?

# जेव्हा घोषणा करू त्याच्या पुढच्या महिन्यांपासून मिळतील-फडणवीस



**मुंबई (वृत्तसंस्था)-यंदाच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सन्माननिधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. त्यामुळे योजनेच्या पात्र महिलांना १५०० रुपये मिळणार आहेत. पण निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेत. लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. प्रत्येक पात्र महिलेला पैसे मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै, डिसेंबर महिना आहे, असेही फडणवीस म्हणाले.**

विधानसभा निवडणुकीवेळी लाडक्या बहिणींचा सन्माननिधी १५०० रुपयांवरून २१०० रुपये करू, असे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? असे विचारले जात होते. तर याबाबत अर्थसंकल्पात निर्णय घेऊ असे, सत्ताधाऱ्यांकडून सांगण्यात आले होते. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर अर्थसंकल्पात २१०० रुपयांबद्दल घोषणा करण्यात येईल, असे सांगितले होते. पण, तशी घोषणा झाली नाही. १५०० रुपयेच मिळणार, हे अर्थसंकल्पानंतर स्पष्ट झाले. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी एकत्रित पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींच्या २१०० रुपयांबाबत प्रतिक्रिया दिली.लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. प्रत्येक पात्र महिलेला पैसे मिळणार आहेत. कुठलीही योजना तयार होते तेव्हा एक गृहितक धरले जाते, तीन कोटी, साडेतीन कोटी. त्या योजनेला अंतिम रुप येते तेव्हा जर ते गृहितक २ कोटी ७० लाख झाले तर तेवढे पैसे वाचतात ना? योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै आहे, डिसेंबर महिना आहे. आवश्यक तेवढी तरतूद आपण यामध्ये ठेवली आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? असे विचारले असता, त्यासंदर्भात



निश्चितपणे आमचे काम चालले आहे. एक लक्षात घ्या अर्थसंकल्पाचा समतोल राखणेही महत्त्वाचे आहे. घोषणा दिली आहे, तर ती पूर्ण करायची आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. सध्या ट्रेंड्स खूप चांगले चालले आहेत. योजना दीर्घकाळ चालवायची असेल तर आपल्याला त्यासाठी आर्थिक तरतुदीही करणे महत्वाचे असते. समतोल राखत पुढे जायचे आहे, त्यामुळे आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. एप्रिल महिन्यात १५०० रुपयेच मिळणार. आम्ही २१०० रुपये कधी मिळणार ते घोषित करु. जेव्हा घोषित करु त्याच्या पुढच्या महिन्यांपासून २१०० रुपये महिलांना मिळण्यास सुरुवात होईल. असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै, २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन आहे.

## कर्जमाफीचा मुद्दा शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा

# अर्थसंकल्पावर बोलताना आकडेवारीसहित मी हा मुद्दा पुन्हा मांडणार-सुधीर मुनगंटीवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी करू, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीवेळी दिले होते. अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीची घोषणा होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र अर्थसंकल्पात कर्जमाफीविषयी कोणताही उल्लेख करण्यात आला नाही. यावरून भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी आपली भूमिका मांडली आहे.भाजपचे ज्येष्ठ नेते



आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकरी कर्जमाफी करण्याची मागणी अर्थसंकल्पानंतर केली. आकडेवारीसहित मी अर्थसंकल्पावरील चर्चेत बोलताना हा मुद्दा मांडणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले. अर्थसंकल्प हा जनतेच्या प्रतिनिधींचा असावा. हा अधिकाऱ्यांचा असता कामा नये, याची काळजी घ्यावी लागते, असे म्हणत मुनगंटीवार यांनी स्वतःच्या सरकारला खडेबोल सुनावले.

आजही माझी मागणी आहे आणि मी अर्थसंकल्पावर बोलताना आकडेवारीसहित मी हा मुद्दा पुन्हा मांडणार असल्याचे सुधीर मुनगंटीवार म्हणाले. कदाचित हा मुद्दा राहिला असेल, पण, हा मुद्दा राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या दृष्टीने उत्पन्न वाढवण्याच्या स्रोतांबद्दलही मी चर्चा करणार आहे. पण, शेतकऱ्यांना मात्र या दृष्टीने कर्जमुक्ती देण्याचा विचार सरकारने करावा, ही विनंती मी विधानसभेत निश्चित करणार आहे, असे सुधीन मुनगंटीवार म्हणालेत.आम्ही लोकांमध्ये जातो. लोकांच्या समस्या ऐकतो. ते प्रश्न अर्थसंकल्पातून कसे सोडवायचे? ते सोडवताना त्या दृष्टीने आपण विविध तरतुदी कशा करायच्या, याचा विचार अर्थसंकल्पात करतो, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले.प्रश्न शिस्त लावणे किंवा लोकप्रिय घोषणांचा नाहीये. आपण जो राज्याच्या प्रगतीचा विभिन्न क्षेत्रामध्ये एक आराखडा तयार करतो. त्यानुरुप असलेल्या संसाधनांचा महत्तम उपयोग करणे म्हणजे अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्प हा जनतेच्या प्रतिनिधींचा असावा. हा अधिकाऱ्यांचा असता कामा नये, याची काळजी घ्यावी लागते, अशा शब्दांत सुधीर मुनगंटीवार यांनी स्वतःच्या सरकारला सुनावले.

# जिल्ह्यात १७ हजार लाडक्या बहिणी लाभास अपात्र!

**भंडारा (वृत्तसंस्था):** राज्यातील विधानसभा निवडणुकीपूर्वी लाभार्थी म्हणून पात्र ठरविण्यात आलेल्या भंडारा जिल्ह्यातील लाडक्या बहिणींच्या प्रस्तावांची ७ मार्चपूर्वीच फेरतपासणी पूर्ण झालेली आहे. या तपासणीत जिल्ह्यातील १७ हजार १८३ लाडक्या बहिणींना वेगवेगळ्या कारणांमुळे मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. सत्तेत बसलेल्या भावाने निवडणूक जिंकण्यासाठी आपली फसवणूक केल्याची भावना व्यक्त होत आहे. योजनसाठी अपात्र झालेल्यांकडून यापूर्वी दिलेली अनुदानाची रक्कम मात्र परत घेतली जाणार नाही. मात्र, त्यांचे अनुदान थांबविण्यात आले आहे. भंडारा जिल्ह्यात मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेसाठी नारीशक्ती ॲपच्या माध्यमातून सुमारे २ लाख ९९ हजार ८७१ महिलांनी प्रस्तावाची नोंदणी केली होती. यापैकी २ लाख ८२ हजार ७८८ महिला 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी पात्र ठरविण्यात आल्या. विधानसभा निवडणुका



आटोपून नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर या सर्व प्रस्तावांची जिल्ह्यातील सातही तालुकास्तरीय समितीकडून फेरतपासणी सुरू करण्यात आली होती.

८ मार्चला १ हजार ५०० रुपयांचे वितरणनिकषात न बसणाऱ्यांचे अर्ज अपात्र ठरविण्यात आल्यानंतर राज्य शासनाकडून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रतिमाह १५०० रुपयांचे वितरण करण्यात आले. अपात्र ठरलेल्या १७ हजार १८३ लाडक्या बहिणी लाभापासून वंचित राहिल्याची माहिती आहे.

# एसटी महामंडळाची झोळी अर्थसंकल्पात रिकामी

**नागपूर (वृत्तसंस्था)**- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) आर्थिक संकटात असून सर्व प्रकारची थकीत देणी चुकती करण्यासाठी तसेच नवीन गाड्या घेण्यासाठी महामंडळाला सात हजार कोटींची गरज आहे. परंतु अर्थसंकल्पात पुरेसा निधी दिसत नसल्याने एसटीची झोळी रिकामीच असल्याचे दावा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. त्यांनी एसटीच्या थकीत रकमेचा पाढाच मांडला.



एसटी महामंडळ आर्थिक संकटात असून सर्व प्रकारची थकीत देणी चुकती करण्यासाठी तसेच नवीन गाड्या घेण्यासाठी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पात एसटीसाठी आर्थिक मदत पॅकेज मिळेल असे वाटत होते. परंतु पुरेसा निधी उपलब्ध करण्यात शासनाला रस दिसला नाही. नवीन गाड्या घेण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्या बाबतीतील करण्यात आलेल्या घोषणेत स्पष्टता नाही, असेही श्रीरंग बरगे म्हणाले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात एसटीच्या ताफ्यात स्व- मालकीच्या नवीन ५ हजार गाड्या घेण्यासाठी व सहा हजार कोटीची थकीत रक्कम देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे वाटत होते. परंतु काहीही झालेले नाही. थकीत रक्कम देण्यासाठी निधीच मिळाला नाही. स्व- मालकीच्या नवीन गाड्या घेण्यासाठी किती निधी देणार या बाबतीत स्पष्टता नाही. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलेल्या ५ हजार गाड्या घेण्यासाठी २ हजार कोटी रुपयांची गरज असून त्या बाबतीत स्पष्टता नाही.

# बलात्कार करणाऱ्या नराधमांना नपुंसक करा-राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**-महिलांच्याबाबतीत घडणाऱ्या अशा घटना कमी करायच्या असतील तर मनातच भीती निर्माण करायला हवी. यासाठी महिलांची छेड काढणाऱ्यांना थेट चोप आणि बलात्कार करणाऱ्या नराधमांना नपुंसक केलं पाहिजे, असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी म्हटले आहे. राज्यात महिला अत्याचाराच्या घटना चिंतेचा विषय बनल्या आहेत, याप्रकरणी राज्यपाल बागडे यांनी हे वक्तव्य केले आहे.

राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले की, महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य होते, तेव्हा गावचा एका पाटील होता. त्याने



एका तरूणीवर बलात्कार केला. ते दुष्कृत्य समोर येताच शिवाजी महाराजांनी थेट आदेश दिला. अत्याचार करणाऱ्याला जीवे मारू नका, त्याचे हात-पाय तिथल्या तिथे तोडा, असे शिवाजी महाराजांनी सांगितले होते. मरेपर्यंत तो (पाटील) तशाच अवस्थेत राहिला. सोमवारी बलात्काराच्या वाढत्या घटनांबाबत बोलताना भरतपूर जिल्हा बार असोसिएशनच्या शपथविधी समारंभात व्यासपीठावरून राज्यपालांनी हे वक्तव्य केले आहेहरिभाऊ बागडे म्हणाले की, काही लोक महिलांवर अत्याचार होत असतानाही व्हिडिओ बनवत असतात. जे योग्य नाही. आपल्या समोर अशी घटना होत असले तर त्याला पकडा. एकटे आहात म्हणून मागे हटू नका. समोर या आणखी २-४ लोक मदतीला येतील. जोपर्यंत विनयभंग करणाऱ्याला आपण चोप देत नाही तोपर्यंत अशा गुन्ह्यांना आळा बसणार नाही.

# रवींद्र धंगेकरांचा काँग्रेसला रामराम: शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत केला प्रवेश ;तीन पक्षांतरानंतर केली घरवापसी

**मुंबई (वृत्तसंस्था)**-काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. आज संध्याकाळी त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. उपसभापती नीलम गोऱ्हे आणि प्रकाश सुर्वे यांची उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. यावेळी रवींद्र धंगेकरांसोबत अनेक कार्यकर्त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. तीन पक्षांतर केल्यानंतर धंगेकर यांची शिवसेनेत घरवापसी झाली. दरम्यान काही दिवसांपूर्वी रवींद्र धंगेकर यांनी व्हाट्सअपला स्टेटस ठेवत सगळ्यांच्या नजरा खिळवल्या आहेत. गळ्यात भगवा परिधान करून धंगेकर यांनी 'शहा का रुतबा' हे गाणे त्याला लावले होते. यामुळे ते पक्ष सोडणार अशी चर्चा सुरू झाली होती. पण अखेर आज या चर्चांना पूर्णविराम लागला आहे.

रवींद्र धंगेकर हे पुण्यातील लोकप्रिय लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी त्यांची ओळख कामाने निर्माण केली आहे. यांच्या पोटनिवडणुकीवेळी मी तिकडे होतो. ती निवडणूक गाजली पण, सगळी फौज लागली तरी धंगेकरांनी बाजी मारली आणि लोकसेवक काय असतो हे दाखवले. आता तुम्ही शिवसेनेत आला आहात, त्यामुळे लोकांना कळेल हू इज धंगेकर? असे एकनाथ शिंदे यावेळी बोलताना म्हणाले.रवींद्र धंगेकर हे मूळचे शिवसैनिक आहेत. २००२ ला ते पहिल्यांदा शिवसेनेकडून नगरसेवक झाले. राज ठाकरेंनी शिवसेना सोडल्यानंतर धंगेकरांनी



मनसेमध्ये पक्षप्रवेश केला. २००७, २०१२ ला ते मनसेच्या तिकीटावर नगरसेवक झाले. २००९, २०१४ ला त्यांनी मनसेकडून विधानसभा लढवली होती. त्यावेळी गिरीश बापट यांनी त्यांचा पराभव केला होता. २०१७ मध्ये रवींद्र धंगेकर यांनी राज ठाकरेंदेखील सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यावेळी ते काँग्रेसकडून नगरसेवक झाले.२०२३ साली मुक्ता टिळक यांच्या कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूकीत विजय मिळवत रवींद्र धंगेकर पुन्हा चर्चेमध्ये आले. यावेळी प्रचारात 'थहे खी उ्हरपसशज्ञरी' असा सवाल विचारत चंद्रकांत पाटलांनी खिल्ली उडवली होती. पण रवींद्र धंगेकर यांनी कसब्यात भाजपच्या उमेदवाराचा पराभव करत 'थहे खी उ्हरपसशज्ञरी' या प्रश्नाचे उत्तर दिले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये मुरलीधर मोहोळ यांनी रविंद्र धंगेकरांचा पराभव केला. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत भाजपच्या हेमंत रासने यांच्याकडून रवींद्र धंगेकरांना पराभव स्वीकारावा लागला.पक्षप्रवेशापूर्वी रवींद्र धंगेकर म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मी कामानिमित्त मागे दोन ३ वेळा भेटलो होतो. उदय सामंत यांची आणि माझीही भेट झाली. त्यांनी मला सांगितले की तुम्ही आमच्यासोबत काम करा. या बातम्यादेखील माध्यमांनी दाखवल्या. मी मतदारांशी चर्चा केली त्यांनी मला सांगितले की काम तर करावेच लागणार आहे, म्हणून मी शिवसेना प्रवेशाचा निर्णय घेतला आहे. मी आमदार असताना एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होते त्यांनी मला नेहमीच सहकार्य केले आहे. सर्वसामान्य लोकांमध्ये त्यांचा चेहरा आहे त्यांच्यासोबत काम करावे अशी मी भूमिका घेतली आहे. एकनाथ शिंदे यांना मी विधान परिषद किंवा म्हाडाचे अध्यक्षपद मागितलेले नाही.

## संपादकीय

# जे रम्य ते बघूनिया...



'जेथे रहावयाचे तेथे सौंदर्य निर्माण करावयाचे' हा मानवाचा धर्म आहे. मन, बुद्धी, वाचा आणि देहाच्या विविध शक्ती यांचा उपयोग सौंदर्यपोषणासाठी करणे म्हणजे सौंदर्याभिरुची. सुंदर वस्तू शोधणे, निर्माण करणे, सांभाळणे, जोपासणे, वाढविणे, टिकविणे, कुठल्याही सौंदर्याला कधीही धक्का लागणार नाही, याची काळजी वहाणे या आणि अशा वृत्ती जेथे असतील, तेथे सौंदर्याभिरुची आहे असे समजावे. तेथेच जीवन सुख आहे, पर्यायाने आनंद आहे.

अनेक पशुपक्षी अतिशय सुंदर दिसतात, पण ती त्यांना निसर्गाची पर्यायाने, देवाची देणगी आहे. त्यासाठी ते स्वतः जाणीवपूर्वक प्रयत्न करीत नाहीत. घराच्या मागच्या झाडांवर चपळ खारीचे धावणे मी नेहमीच बघतो. धावता धावता ती थबकते, वळून पाहते, गोंडेदार शेपूट हलवते व बघता बघता दुसऱ्या फांदीवर निघून जाते. ते सर्व काही सुंदर असते. राणीच्या बागेत हरणांचे डोळे तर सशांचे पांढरे-शुभ्र मऊ मखमली अंग, मोराचा पिसारा, वाघाचे पट्टेदार धिप्पाड शरीर, हत्तीचे पांढरे शुभ्र दात, लांब सोंड आणि डौलदार चाल या सर्व गोष्टी सुंदर असतात. पण कोणासाठी? मनुष्यासाठी. कारण आपल्या ठिकाणी सौंदर्यभावना असते, तोच जीवन आनंद आहे. आरडाओरड करण्यासाठी शक्ती लागत नाही, तर शांत राहण्यासाठीच अधिक शक्ती लागते. आणि यास जर अध्यात्माची जोड असेल, तर संयम राखणे सोपे जाते. संयमी मन ही दुर्बलतेची निशाणी नसून आत्मिक शक्तीचा साक्षात्कार असतो. शांत राहणे हा पराभव नसून प्रगल्भतेची ताकद असते, कसोटी असते.

गुरुजींच्या संगमेश्वरच्या मठात दर पावसाळ्याच्या सुरुवातीस काही संन्याशी रहावयास येतात. नुकताच पावसाळा सुरू झाला होता; आणि एक संन्याशी, मठाकडे येताना दोन्ही बाजूला काहीतरी फेकीत येत होता. परत झोळीत हात घालून तेच करीत होता. त्यांना विचारले, 'महाराज आपण हे काय करत आहात?' ते म्हणाले या फुलझाडांच्या बिया आहेत. आणि पाऊस पडल्यावर रोपे उगवतील व लवकरच त्यांच्यावर मोठमोठी रंगबिरंगी फुले येतील. अहाहा! दोन्ही बाजूंनी फुलेच फुले! मग हा रस्ता किती बरे रमणीय वाटेल? ते संन्याशी पुढे म्हणाले, 'मी हेच काम करीत करीत, इतर पडेल ती कामे करतो. मात्र, दिवाळीचा पाडवा झाल्यावर अन्यत्र जातो. हा माझा छंद आहे. येथे मी फळझाडांना, फुलझाडांना खत घालतो व मठ परिसर झाडझूड करून स्वच्छ ठेवतो. नंतर धार्मिक ग्रंथांचे पारायण करून भजन, पूजन, ध्यान करतो. म्हणून ठायी ठायी सौंदर्य निर्मिती करून त्या परमसुंदराची पूजा करतो व ते मोठ्या गुरुजींना खूप आवडते. यात आपले जीवन सफल होते. हा एक जीवन आनंदच आहे. तो मला अनुभूतीतून प्राप्त होतो.

प्रतिवर्षी हजारो रसिक काश्मीर, गोवा, वेरूळ, अजिंठा, कोणार्क, चारधाम इत्यादी ठिकाणी जातात. काही हिमालयाच्या पायथ्यावरून त्यांच्या सुवर्णकांती शिखराकडे टक लावून बघतात. तर काही समुद्रकिनारी जाऊन लाटांचे तांडव पाहतात. उगवत्या आणि मावळत्या सूर्यबिंबाची शोभा मी सूर्यमाळ, जव्हार, तसेच कन्याकुमारीला बघितली. स्वामी विवेकानंदांचे शिळास्मारक तर इतके रमणीय आहे की, तेथे गेल्यावरच त्याचे महत्त्व उमगू शकते. यासाठी आयुष्यभर पैसा पैसा न करता वेळ काढून तेथे जाणे आहे. पंढरपूरच्या वारीचा आनंद आणि परम पांडुरंगाचे दर्शन किती सुखकारक आहे, हे स्वानुभवातूनच दिसते. जीवन आनंद हा स्वतः मिळविण्याची गोष्ट आहे.

जे रम्य ते बघूनिया, मज वेड लागे
गाणे मनात मग होय, जीवन गाणे...

मानवी जीवन हे संघर्षमय असले तरी, खाली ओढणारे जडतत्व आणि वर उचलणारे नीतीतत्त्व यांच्या ओढाओढीतून माणसाला आधार देणारी आणि सांभाळणारी कलेच्या, अनुभूतीच्या आणि क्रीडेच्या रूपाने गवसलेली जी शक्ती, तीच सौंदर्य उपासना. मी जेथे कोठे जाईन तेथे सौंदर्यच फुलवीन अशी प्रत्येकाची जिद्द हवी. माझे बोलणे, चालणे, वागणे, उठणे, बसणे, विचार करणे सर्व काही सुंदर,पर्यायाने आनंदी हवे. मुख्य म्हणजे आपण आज आनंदी दिसण्यासाठी जितकी धडपड करतो, तितकीच किंबहुना त्यापेक्षा अधिक धडपड त्याने जीवन आनंदी करण्याकरिता केली पाहिजे. हीच जीवनाची सार्थकता.


# छतावरचे पाणी देई 'जलसमृद्धी'

तापमान वाढीचे चटके, पाणी टंचाईने कोरडे झालेले घसे यांच्यासह 'नेमेची येतो पावसाळा' म्हणत पुन्हा एकदा पावसाच्या वाटेकडे डोळे लावून बसलो आहोत. भर उन्हात पाण्याच्या टँकरची तिष्ठत प्रतिक्षा करणारे आपण; पावसाच्या जलधारांमध्ये चिंब भिजतांना सोसलेली पाणी टंचाई अशीच विरघळून जाऊ देणार आहोत का? याचे उत्तर नकारार्थी असेल तर आत्ताच वेळ आहे उठा आणि कामाला लागा. इकडे तिकडे कुठंही जाण्याची गरज नाही. आपल्याच घराच्या छतावर पडून वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरवा. एरवी हे वाहून जाणारे पाणीच तुम्हा आम्हाला आणि पर्यायाने आपापल्या गावाला 'जलसमृद्धी' देणार आहे हे निःसंशय.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पाणीटंचाई निवारणार्थ पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी गावांतील विहीरी, बोअरवेल मध्ये साठवून जलपुनर्भरण करण्यासाठी 'जलसमृद्ध गाव अभियान' राबविण्याचे नियोजन केले आहे. यंदा जिल्ह्यात उन्हाळ्याच्या अखेरीस पाण्याची टंचाई भासली. या टंचाईच्या निवारणार्थ टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागत आहे. ही वेळ पुन्हा येऊ नये आणि 'पाण्यासाठी दाही दिशा' अशी अवस्था होऊ नये यासाठी आत्ताच नियोजन करुन जलसमृद्ध गाव अभियानासाठी काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी जलपुनर्भरण, पर्जन्यजल साठवण या सोप्या उपाययोजनांची माहिती या लेखाद्वारे देत आहोत.

पावसाळ्यात डोळ्यादेखत पूराचे पाणी वाहून जातांना बघणे आणि उन्हाळ्यात डोळ्यात पाणी आणून पाणी टंचाई पाहणे; ही परिस्थिती आज आपणा साऱ्यांवर आली आहे. एप्रिल महिन्यापासून तापमान वाढत आहे. भूजलपातळी खूप खोल गेल्यामुळे कूपनलिका व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पाण्यासाठी विंधन विहिरी तीनशे फूट खोल घेऊनसुद्धा पाणी लागत नाही. ही विपर्यस्त स्थिती टाळण्यासाठी भूजल पुनर्भरण हा रामबाण उपाय आहे.

पर्जन्यजल साठवण (Rain Water Harvesting) ही जलसंधारणाची एक अत्यंत साधी, सोपी व स्वस्त उपाययोजना आहे. पावसाचे पाणी जे एरवी वाहून जाते, ते अडवून जमिनीत मुरविण्याच्या अनेक उपाययोजना आहेत. आपल्या घर्च्या छतावर पडणारे पावसाचे पाणी एकत्र करण्यासाठी छपराच्या टोकाला अर्धनळी किंवा पन्हळ जोडून त्याद्वारे वाहत्या पाण्याला वाट देऊन पाईपद्वारे पाणी साठवण टाकी व तेथून गाळून हे पाणी विहीरी, कुपनलिका इ. मध्ये साठवून भूजल साठ्यात जमा केले जाते. थोडा इतिहासअशा प्रकारे पर्जन्यजल साठविण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून जलटंचाई प्रदेशात प्रचलित असल्याचा उल्लेख आढळतो. इ.स.पू. ३०० पासून बलुचिस्तान,अफगाणिस्तान, इराण आणि भारतामधील कच्छ, राजस्थानचा भाग या प्रदेशात या पद्धतीने पाणी संकलित करुन साठवून वर्षभर वापरण्याची प्रथा असल्याचे दिसून येते. इतकेच नव्हे तर भारतात प्राचीन काळात इ.स. १०११ ते १०३७ दरम्यान तमिळनाडू राज्यातील कडलोर जिल्ह्यात पर्जन्यजल साठविण्यासाठी जलकुंभ बांधल्याची नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रत्येक गड किल्ल्यावर याच पद्धतीने खडकात टाके करुन त्यात पावसाचे पाणी साठवून हेच पाणी विहीरीतून वर्षभर उपयोगात आणल्याचे दिसून येते. अनेक गडकिल्ल्यांवर या उपाययोजना आजही अस्तित्वात असल्याचे पहावयास मिळते. तमिळनाडू राज्यात प्रत्येक घरागणिक पर्जन्यजल साठवण अनिवार्य केल्यामुळे गेल्या पाच वर्षांत तेथे पाणीटंचाईवर मात करुन चेन्नईमध्ये पर्जन्यजल पातळीत ५०% वाढ झाली आहे. उपयुक्तता पर्जन्यजल साठविल्यामुळे पाण्याची उपलब्धता वाढते शिवाय त्या प्रदेशातील जलसुरक्षा स्थितीत सुधारणा होते. पाणी टंचाईच्या काळात हा हमखास उपाय होय. एरवी पडणारा पाऊस जमिनीवरुन वाहून जातो, मात्र ह्या पद्धतीने वाहणारे पर्जन्यजल अडवून साठविल्याने ते जमिनीत पाझरते व भूजल पातळीत वाढ होते. पर्जन्यजल वाहून जाण्यास प्रतिबंध घातला जात असल्याने मातीचे कण वाहून जाण्यावर नियंत्रण येते व मृदा संधारणास मदत होते. पर्जन्यजल साठवून त्यावर संस्करण केल्यास ते पिण्यासाठीही वापरता येते. याशिवाय हे जल उद्योग, सिंचन, इतर घरगुती वापरासाठी, स्वच्छतेसाठी व बागकामासाठी वापरता येते.




कसे करावे जलपुनर्भरण घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी पन्हाळी द्वारे अथवा पाईपाद्वारे एकत्र संकलित करावे. हे पाणी एका साठवण टाकीत घ्यावे तेथे त्यातील घाण कचरा, गाळ इ. स्थिरावल्यावर त्यातून हे पाणी गाळण टाकीत घ्यावे ह्या गाळण टाकीत दगड, वाळू, खडी व विटांचे तुकडे ह्यांच्या थरातून पाणी गाळले जाऊन ते विहीरीत अथवा बोअरवेल मध्ये सोडावे. जेणे करुन हे पाणी थेट रिक्त झालेल्या भुजल साठ्यात जमा होते.

पाण्याचे मोजमापअशा पद्धतीने आपण किती पाणी जमा करु शकतो किंवा ते जमिनीत मुरवू शकतो? ह्याचे साधे सुत्र आहे. वार्षिक सरासरी पाऊस द छपराचा जलधाव गुणांक द छपराचे क्षेत्रफळ = साठणारे एकूण पाणी. अशा प्रमाणात आपण पाणी जमा करुन ते साठवू शकतो, ते ही अगदी विनासायास. आपल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७३४ मिमी आहे. सिमेंटच्या छताचा जलधाव गुणांक हा ०.७ इतका असतो. तेव्हा आपण १०० चौ. मिटर क्षेत्रफळ असलेल्या भागात पडणारे पावसाचे पाणी साठवून तब्बल ५१ हजार लिटर्स हून अधिक पाणी साठवू शकतो.हे पाणी जमिनीत जिरवल्यास तितका भूजल साठा वाढवू शकतो. ही उपाययोजना प्रत्येक घरातून झाल्यास किती पाणी गोळा होईल? याची कल्पना केलेली बरी. मात्र ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी गरज आहे ती कृतीची आणि वेळ आहे आत्ताच!

माहितीस्रोतः
१.जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
२.वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीगर.
३.मराठी विश्वकोष,.

# किमान उपायांची कमाल स्वप्ने

मुंबई महापालिकेने चालू आर्थिक वर्षासाठी 'वातावरणीय अर्थसंकल्प अहवाल' सादर करून पुढचे पाऊल टाकले आहे. असा अर्थसंकल्प मांडणारे मुंबई हे जगातील चौथे शहर असल्याचे सांगण्यात येत आहे. तसे असेल तर मुंबईसाठी ही गोष्ट अभिमानाची. महापालिकेने पर्यावरणानुकूल पावले टाकली तर शहरातील प्रदूषण तसेच कर्बोत्सर्जन कसे कमी होईल, हा या पर्यावरण अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश आहे. कार्बनप्रमाणेच अन्नकचरा तसेच इतरही काही कचऱ्यातून लक्षणीय प्रमाणात मिथेन या वायूचीही निर्मिती होते. या ज्वलनशील वायूचा उपयोग करणे, हेही पर्यावरण राखण्यासाठी आवश्यक आहे. एकूण उद्दिष्टे, त्यासाठीचा कृती कार्यक्रम आणि संभाव्य लक्ष्यपूर्ती अशी या सविस्तर अहवालाची मांडणी आहे. या ७० पानी अहवालात पाच विभाग आणि तीन परिशिष्टे आहेत. यात शहरी उष्णता, शहरात येणारे पूर, दरडी कोसळणे, सागर किनाऱ्यावरील धोके तसेच वायू प्रदूषण या पाच वातावरणीय जोखमींचा समावेश आहे. काय केल्यावर काय होऊ शकते, याचा अगदी दीर्घकालीन हिशेब यात मांडला आहे. म्हणजे उदाहरणार्थ सन २०५०पर्यंत रस्त्यांवरील वाहनांमधून होणारे कर्बोत्सर्जन शून्यावर आणणे. आणखी २५ वर्षांनी मुंबईत खनिज इंधनावर चालणारे एकही खासगी किंवा सार्वजनिक वाहन नसेल, हे स्वप्न चांगले वाटले तरी ते शक्य आहे का, याची संभाव्यताही पाहायला हवी. मुख्य म्हणजे, असे स्वप्न पाहणारा 'वातावरणीय अर्थसंकल्प' मांडला जात असेल; तर त्यासाठी आज आपण काय तयारी करत आहोत, याचाही लेखाजोखा मांडावा लागेल.



मुंबई महापालिकेकडून अपेक्षित असणारी किमान कामे आणि कर्तव्ये यांचे जोडकाम करून ती सगळी या अहवालात टाकून देण्यात आली आहेत. याचेही एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. खरेतर शहरी पूर आणि जलसंपदेचे व्यवस्थापन हे कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचे मूलभूतच कर्तव्य असते. मग पर्यावरण आणि वातावरण यांना व्यापक धोका निर्माण झालेला असो किंवा नसो; पण यासाठी केलेली तरतूद वातावरणीय अर्थसंकल्पात दाखविण्यात आलेली आहे. मलनिस्सारण, कचरा व्यवस्थापन, जलशुद्धीकरण ही कामे महापालिकेने करायलाच हवीत. मुंबई महानगरी पर्यावरणाला अनुकूल आणि कर्बोत्सर्जन विरहीत करण्याचे काम त्याच्या नंतर चालू होते. मुंबई शहरातून समुद्रात जाणारे सर्व अशुद्ध पाणी शुद्ध कसे करता येईल तसेच किमान प्रदूषणकारी व धोकादायक बनवून मगच समुद्रात कसे सोडता येईल, याची कोणतीही व्यापक आणि सर्वंकष योजना मुंबई महापालिकेने इतक्या वर्षांमध्ये राबविलीच नव्हती, असा गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत केला होता. इतकी प्राथमिक गोष्ट जी महापालिका वर्षानुवर्षे करीत नाही, तिने आपण जगाला काहीतरी नवीनच करून दाखवितो आहोत, अशी शेखी मारण्यात काय अर्थ आहे? मुंबईतील पूरनियंत्रणाची तयारी किती आहे, हे समजायला आता फार दिवस राहिलेले नाहीत. मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या, मलनिस्सारण प्रकल्प तसेच वाहिन्या यांची अवस्था चांगली नाही. त्याचा फटका दरवर्षी बसत असतो. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये गेले तर तेथील सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि त्यांची मलनिस्सारण व्यवस्थेशी असणारी जोडणी यांची अवस्था सहज दिसण्यासारखी आहे. यात मुंबईतील स्मशानांमध्ये होणाऱ्या लाकडी चितांवरील दहन संस्काराचा उल्लेख आहे. हे प्रमाण कमी झाले किंवा ते अधिक शास्त्रीय पद्धतीने झाले तर कार्बनचे प्रमाण कसे कमी होईल, तसेच लाकडांची म्हणजे वृक्षांची बचत कशी होईल, हे सांगण्यासाठी या अहवालात अनेक पाने खर्च करण्यात आली आहेत. पुढच्या उद्दिष्टांचे आकडे सांगून स्वत:ची पाठही थोपटून घेण्यात आली आहे. खरे तर मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत आजही कित्येक स्मशानभूमीत लाकडे रचावी लागतात आणि घनदाट वस्त्यांमध्ये दररोज कर्बोत्सर्जन होत राहते; याची शरम महापालिका प्रशासन तसेच निर्वाचित नगरसेवकांना वाटायला हवी होती. अनेक ठिकाणी नागरिकांनी पैसे जमवून डिझेल किंवा विद्युत दाहिन्या बसविल्या आहेत. महापालिकेने मनात आणले तर एका वर्षात मुंबईत एकही लाकडी चिता रचावी लागणार नाही, अशी उत्तम विद्युत दाहिन्यांची व्यवस्था करता येतील. पण मग वातावरणीय अर्थसंकल्पाची पाने कशी भरतील आणि नवीनच काही भव्यदिव्य केल्याचा टेंभा कसा मिरवता येईल? यातले 'बेस्ट'च्या बसगाड्या पारंपरिक इंधनाकडून विजेवर नेण्याचे काम फक्त व्यवस्थित चालू असलेले दिसते. मुंबईतला सेंद्रिय कचरा कमी करणे आणि नागरिकांना कचऱ्याच्या वर्गवारीची सक्ती करणे; यात महापालिकेला अपेक्षित यश आलेले नाही. मुंबईला रोज मिळणाऱ्या किती शुद्ध पाण्याचा फेरवापर होतो? त्याची सक्ती किती ठिकाणी आहे? मुंबईतील चार रुग्णालयांमधील ओल्या कचऱ्यातून वीज करण्याचा प्रकल्प आत्ताशी होतो आहे. तेव्हा, मुंबई महापालिकेने आपली नेहेमीची कामे प्रामाणिकपणे केली आणि दहा वर्षांपूर्वी ठरविलेली उद्दिष्टे जरी पुरी केली तरी पर्यावरण राखले जाईल. नवनवीन अहवालांचे पतंग उडविण्याची गरजही भासणार नाही.

# सैन्यरचनेतील परिवर्तन

सैन्यदलांत परिवर्तन होताना, असे करून त्यांची सामरिक क्षमता आणि संरक्षण सज्जता वाढेल का, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळायला हवे. अनेक वर्षांच्या विलंबानंतर तीनही सैन्यदलांचे एकत्रित कमांड स्थापन करण्याची योजना कार्यान्वित होणार आहे. योजनेची पार्श्वभूमी सर्वश्रुत आहे. कारगिल युद्धात भूदल आणि हवाई दलात आवश्यक तो समन्वय आणि सहकार्य नसल्याने अनेक उपाययोजना सुचविण्यात आल्या. त्यातील प्रमुख म्हणजे सैन्यदलांच्या सरसेनापतींचे पद (सीडीएस) आणि तीनही सैन्यदलांचे एकत्रित कमांड.अनेक वर्षांच्या चर्चांनंतर सन २०१९मध्ये सरकारने तत्कालीन लष्करप्रमुख जनरल बिपीन रावत यांना सीडीएसपदी नेमले व त्यांचे अधिकार ठरवताना संरक्षण खात्यात 'डिपार्टमेंट ऑफ मिलिटरी अफेअर्स' ही सचिवस्तरीय शाखा स्थापली. संरक्षण खात्याच्या प्रमुख सचिवांना सर्वाधिक अधिकार दिले. वास्तविक सीडीएस हेच सर्वांत ज्येष्ठ असायला पाहिजे होते; परंतु, जनरल रावत यांनी आक्षेप न घेता सर्व मान्य करत हे पद सांभाळले. सन २०२१मध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनेत त्यांचे निधन झाले. नऊ महिन्यांच्या विलंबानंतर, निवृत्त झालेले लेफ्टनंट जनरल अनिल चौहान यांना सीडीएस करण्यात आले आणि त्यांना एकत्रित कमांड आणि अनुषंगाने मनुष्यबळ कमी करण्याची जबाबदारी दिली. एकत्रित कमांड योजना पहिल्यापासून वादग्रस्त ठरली. परंतु आता तीन प्रमुख एकत्रित भौगोलिक कमांड स्थापन होतील, असे समजते. एक कमांड मुख्यालय जयपूर येथे पश्चिमी सीमेसाठी, उत्तरी सीमेसाठी लखनौत आणि दक्षिणेत सागरी सीमाक्षेत्र सांभाळण्यासाठी कोईमतूर येथे कमांड स्थापन होण्याची शक्यता आहे. या निमित्ताने काही मुद्दे...तीनही सैन्यदलांत समन्वय व वाढत्या मनुष्यबळात घट, हे आवश्यक आहेच; परंतु ते कसे करावे हा कळीचा मुद्दा आहे. प्रत्येक सैन्यदलाची जबाबदारी, कार्यशैली, प्रशिक्षण हे आजवर ऐतिहासिक कारणांसाठी वेगळे आहेत व यामुळे एकच काम तिन्ही दलांत वेगवेगळे केले जाते. यामुळे, अवाजवी श्रम आणि अवाजवी खर्च होतो. तिन्ही सैन्यदलांचे क्षेत्रीय आणि कमांड मुख्यालये वेगवेगळ्या ठिकाणी स्थापित आहेत; त्यांना सहज एका जागी नेता येईल. अधिक महत्त्वाचे म्हणजे युद्धकाळात समन्वय आणि नियंत्रणाची जबाबदारी वाटताना कोणतीही उणीव नको. भू-सीमा आणि सागरी क्षेत्र हे लष्कर आणि नौदल सांभाळतात. प्रश्न येतो हवाई दलाचा. आपल्याकडे हवाई दलाच्या लढाऊ विमानांची कमतरता आहे. हवाई दलाच्या बळात लवचिकता असल्याने त्यांना फक्त एका क्षेत्रात बांधता येत नाही आणि वादाचा हा प्रमुख मुद्दा आहे. सर्व प्रश्न आत्तापर्यंत व्यवस्थापनाचे झाले; परंतु संरक्षण धोरणावर याचा कसा प्रभाव पडतो, हा खरा चर्चेचा मुद्दा हवा. सन १९४७पासून सीमा संरक्षणावर आपले धोरण आखलेले आहे आणि १९६२च्या पराभवानंतर आपण एक इंच जमीन गमावायला तयार नाही. घोषवाक्य म्हणून ठीक असले तरी लढाईत आक्रमक किंवा बचाव परिस्थितीत सीमा संरक्षण करताना शत्रूच्या सीमेत आक्रमण करण्याची क्षमता लागते आणि मुख्यतः चीनविरुद्ध कारवाई करण्याची तजवीज हवी. उदा. आत्तापर्यंत चीन सीमेवर आपण हवाई दल वापरलेले नाही. आता आघाडीवर लढाऊ आणि रसद पुरवणाऱ्या विमानांसाठी धावपट्टी कार्यरत केल्या आहेत. ही क्षमता योग्य संकेत पाठवत असली तरी प्रत्यक्षात त्यांचा सीमेपलीकडे वापर झालेला नाही. पाकिस्तानविरुद्ध अशी मर्यादा पाळलेली नाही; मग चीनबद्दल संकोच का असावा? नुकसान होईल म्हणून, की लढाईचे क्षेत्र वाढेल म्हणून, किंवा पराभव होण्याची शक्यता म्हणून, हे अनुत्तरित प्रश्न आहेत. आज भारत पूर्वीसारखा राहिला नाही. मग आपण उगीच थबकतो आणि मानसिक दबाव आणायला शत्रूलाच मदत करतो. अर्थात, हे सर्व योग्य विचार करून करावे लागेल. सन १९६७मध्ये सिक्कीमच्या नथुला खिंडीत आणि सन १९८७मध्ये अरुणाचल प्रदेशात तवांग क्षेत्रात सुमडोरोंग चू येथे आपण चीनला नमते घ्यायला भाग पाडले. आता परत असे करण्याची वेळ आली आहे. अट एवढीच, की कारवाई पूर्ण विचार आणि तयारीनंतर झाली पाहिजे. आधुनिक लढाईत, आधी हवाई दल, मग मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे, नंतर तोफांचा भडिमार आणि अखेर भूदलाची आघाडी असा अनुक्रम हवा. शत्रूच्या हालचालींचे भाकीत कोणी करू शकत नाही. परंतु युद्धात आक्रमक पवित्रा घेतल्याशिवाय विजय अशक्य असतो. अशा स्थितीत एकत्रित कमांड उपयुक्त असतील आणि सर्व योजनेला अण्वस्त्रांचे कवच असेल तर पूर्ण युद्धाची रुपरेषा बदलेल. हाच एकत्रित कमांडचा मुख्य उद्देश हवा.सैन्यदलांचे आणि विशेषत: लष्कराचे मनुष्यबळ कमी झाल्याशिवाय संरक्षणखर्च घटणार नाही. ही घट करण्याच्या उपायांचे अनेक पैलू आहेत.

# राज्यातील गड,किल्ले, दुर्गांचे संवर्धन करणार वाढदिवसानिमित्त खा.नीलेश लंके यांचा संकल्प

## खा.नीलेश लंके यांच्या अभिष्टचिंतनासाठी हंगे येथे गर्दीचा महापुर

**पारनेर । प्रतिनिधी**

एक दिवस महाराजांसाठी महाराजांच्या स्वराज्यासाठी स्वराज्याच्या गड किल्ल्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे सहयाद्रीच्या कुशीतील गड, किल्ले तसेच दुर्ग यांच्या संवर्धनाची मोहिम महिन्यातून एका रविवारी करण्याचा संकल्प खासदार नीलेश लंके यांनी वाढदिवसानिमित्त केला. रविवार दि.१६ मार्च रोजी या मोहिमेस शिजन्मभुमी किल्ले शिवनेरी येथून सुरूवात होणार असल्याचे खा. लंके यांनी यावेळी जाहिर केले. हंगे येथे खा. नीलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी जिल्ह्याच्या विविध भागांतून अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. पुरूषांबरोबरच महिलांची गर्दीही यावेळी लक्षणीय होती.

आपल्या संकल्पाविषयी बोलताना खा. लंके यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे, दुर्गांचे जतन, संवर्धन आणि पुनरूज्जीवन करण्याची चळवळ हाती घेण्यात येत आहे. सहयाद्रीच्या कुशीतील किल्ले टिकविणे, ऐतिहासिक संस्कृती, पर्यावरणाची जपवणूक करणे ही काळाची गरज आहे. किल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे यांच्या पराक्रमाचे प्रतिक असल्याचे खा. लंके यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे यांचे स्वराज्य हे किल्ल्यांवरच उभे आहे. किल्ले, दुर्गांवरील प्लॅस्टिक, कचरा व पडझड हे किल्ल्याच्या दृष्टीने नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी महत्वाचा विषय आहे. या गड संवर्धन मोहिमेमध्ये कोणताही राजकिय दृष्टीकोन असणार नाही. महाराजांचे विचार व गड किल्ल्यांची मोहिम भक्कम करण्यासाठी ही मोहिम हाती घेण्यात येणार असल्याचे खा. लंके यांनी यावेळी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील किल्ले, गड, दुर्ग यांचे जतन, पुनरूज्जीवन, संरक्षण हे फक्त ऐतिहासिक स्मारकाचे रक्षण नसून पर्यावरण, संस्कृती व इतिहासाची जोपासणा करण्याचे एक महत्वाचे कार्य आम्ही हाती घेत असल्याचे लंके म्हणाले. इतिहासाचे प्रतिक असलेल्या गड, किल्ल्यांचे संवर्धन संस्कृतीचे द्योतक, पर्यावरण रक्षण, पर्यटन आणि रोजगार, गडाचे संवर्धन, स्वच्छता व पर्यावरण संवर्धन, संशोधन व प्रबोधन अशा पध्दतीने ही मोहिम राबविण्यात येणार असल्याचे लंके यांनी सांगितले. या मोहिमेद्वारे राज्यातील समाजप्रबोधनकार, शिवरायांचे विचार सांगणारे अभ्यासू, पर्यावरण तज्ञ लोकांचा एक स्वतंत्र गट तयार करून गडाचा संरक्षण अहवाल स्थानिक सहभाग, सरकारी योजनांचा निधी, पर्यावरण संरक्षण, गडाचा इतिहास, जुने नकाशे, गडासबंधी माहिती ऑफ लाईन तसेच ऑनलाईन अपलोड करणे हे काम या मोहिमेत करण्यात येणार असल्याचे खा. लंके म्हणाले. या मोहिमेत स्वयंसेवकाच्या भूमिकेत मी असून सर्वांनी महाराजांचे आपण पाईक म्हणून स्वयंसेवकाच्या भूमिकेत आपण सर्वजण सहभागी होऊ या असे आवाहन खा. नीलेश लंके यांनी केले आहे.



### शालेय साहित्याची तुला

**खा. लंके यांचे पैठण येथील सहकारी जितूभैय्या परदेशी यांच्या वतीने खा. नीलेश लंके यांची शालेय साहित्याची तुला करण्यात आली. शालेय साहित्यामध्ये वही, पेन तसेच शालेय विद्यार्थ्यांना आवष्यक साहित्याचा समावेश होता.**

### भजी, जिलेबीचा नास्ता

**खा. लंके यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी हंगे येथे जिल्हयासह राज्याच्या विविध भागातून हजारो नागरीकांची सकाळपासूच रिघ लागली होती. खा. लंके यांना कार्यक्रमस्थळी येण्यास उशिर होउनही गर्दीचा ओघ कमी होत नव्हता. आलेल्या पाहुण्यांसाठी गरम भजी आणि जिलेबिच्या नास्त्याची सोय करण्यात आली होती.**

# लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने समन्वयाने योजनांची अंमलबजावणी करावी

## जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम लोकप्रतिनिधी करत असतात. सर्व विभागांच्या योजनांची अंमलबजावणी प्रशासन उत्कृष्ट पद्धतीने करत आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने योग्य समन्वय साधून योजना तसेच प्रकल्पांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.मंत्रालयातील सभागृह परिषद येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत श्री. विखे-पाटील बोलत होते. यावेळी राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले, शेवगाव मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे, पारनेर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, नेवासा मतदारसंघाचे आमदार विठ्ठल लंघे, संगमनेर मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ, श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रम



पाचपुते, अकोल मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे तर दूरदृश्य प्रणालीद्वारे पोलीस अधीक्षक राकेश ओला तसेच जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री श्री. विखे-पाटील म्हणाले की, जिल्हा परिषदेअंतर्गत तालुक्याच्या ठिकाणी काही आरोग्य उपकेंद्रांची कामे पूर्णत्वास येत आहेत. अशा उपकेंद्रांची माहिती घेऊन ती हस्तांतरित करावीत. तसेच नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या उभारणीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत. जलजीवन मिशन अंतर्गत योजनांचा आढावा घ्यावा. पिण्याच्या पाण्याच्या टँकरची मागणी वाढत आहे याबाबत जिल्हा प्रशासनाने बैठकीचे आयोजन करून टँकरचे नियोजन करावे. जिल्ह्यातील ज्या प्रशासकीय विभागांचे प्रलंबित विषय आहेत. ते मार्गी लावण्यासाठी त्या विभागांच्या मंत्रीमहोदयांकडे बैठका घेऊन विषयांचा निपटारा करण्यात येईल. यासाठी जिल्हा प्रशासनाने तालुकानिहाय आढावा बैठका घ्याव्यात. या बैठकांच्या माध्यमातून योजना प्रकल्पांची माहिती लोकप्रतिनिधींना उपलब्ध करून द्यावी, असे श्री.विखे-पाटील यांनी सांगितले.अहिल्यानगर जिल्ह्यातील महसूल, ग्रामविकास, नगरविकास, कृषी, सार्वजनिक आरोग्य, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण आदी विभागांच्या वतीने सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा यावेळी घेण्यात आला

# निवडणूक प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी निवडणूक आयोगाची राजकीय पक्षांसोबत चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने (एउख) सर्व राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांना ३० एप्रिल २०२५ पर्यंत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही अपूर्ण राहिलेल्या मुद्द्यांवर सूचना देण्याचे आमंत्रण दिले आहे. आयोगाने पक्षांना पाठवलेल्या पत्रामध्ये पक्षाध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांसोबत परस्पर सोयीस्कर वेळी संवाद साधण्याची कल्पना मांडली आहे, जेणेकरून कायदेशीर चौकटीत राहून निवडणूक प्रक्रिया अधिक बळकट करता येईल. मागील आठवड्यात झालेल्या निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील मुख्य निवडणूक अधिकारी (CEO), जिल्हा निवडणूक अधिकारी (DEO) आणि निवडणूक नोंदणी अधिकारी (ERO) यांना राजकीय पक्षांसोबत नियमित संवाद साधण्याचे निर्देश दिले होते. तसेच, अशा बैठकीत मिळणाऱ्या सूचनांचे निराकरण प्रस्थापित कायदेशीर चौकटीतच करण्यास सांगितले होते. या संदर्भात, आयोगाने ३१ मार्च २०२५ पर्यंत कार्यवाही अहवाल सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.राजकीय पक्ष हे निवडणूक प्रक्रियेशी संबंधित प्रमुख घटक असून, भारतीय संविधान आणि कायदेशीर चौकटीत २८ घटकांचा समावेश आहे. निवडणूक



आयोगाने आपल्या पत्रात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० आणि १९५१, मतदार नोंदणी नियम, १९६०, निवडणूक आचारसंहिता १९६१, तसेच सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि आयोगाने वेळोवेळी जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे या माध्यमातून पारदर्शक आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित केली असल्याचे नमूद केले आहे. आयोगाच्या वेबसाइटवर ही सर्व नियमावली उपलब्ध आहे.राजकीय पक्षांनी या विकेंद्रित संवाद प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी व्हावे, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

# न्यु इंटेल कॉम्प्युटर्स मध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा


**केज (प्रतिनिधी):** केज येथील नामांकित न्यु इंटेल कॉम्प्युटर्स याठिकाणी रविवारी सकाळी वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी महिलांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याविषयी सविस्तर वृत्त असे केज तालुक्यातील सुप्रसिद्ध व संगणक शिक्षणाबरोबरच वेगवेगळे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम नियमित राबविले जातात त्याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील महिलांचे मनोबल वाढवण्यासाठी व महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रात काम करण्यासाठी उत्तेजन मिळावे म्हणून काही यशस्वी महिलांचा सन्मान करण्यात आला.यावेळी सर्वप्रथम स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. व नंतर येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर च्या प्राचार्या सौ.शैलाताई इंगळे मॅडम यांचा सेंटर च्या वतीने संचालक सौ विजया सत्वधर यांनी सत्कार केला.




यावेळी बोलताना प्राचार्या सौ. शैलाताई इंगळे यांनी मुलींनी भरपुर शिकले पाहिजे तसेच व स्व संरक्षणासाठी व विकृत मनोवृत्ती ना धडा शिकविण्यासाठी कराटे प्रशिक्षण घेतले पाहिजे व प्रत्येक क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादित केले पाहिजे असा सल्ला दिला.यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारथी २०२४ बॅच ची विद्यार्थिनी अपेक्षा अशोक कापरे हिने केले तर आभार प्रदर्शन सौ विजया सत्वधर यांनी केले.या कार्यक्रमासाठी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा स्मृतीदिन साजरा



**चौसाळा (प्रतिनिधी):** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिना निमित्त बीड तालुक्यातील मानेवाडी येथे राजमाता माँसाहेब जिजाऊ महीला सेवाभावी संस्थेच्या वतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी संस्थेच्या महिला सदस्य कमल माने,भीमाबाई गाडे,भागीत्रा मोरे,सुदामाती मोरे,नंदूबाई रमाने,सुखमल मोरे,विमल माने,उषा आवारे,कुशवार्ता इंगोले,सुमल काळे,गंगु आवारे,अनिता माने, साखरबाई शिरसाट,रत्नमाला माने,उषा जगताप,अमेरिका गाढवे,सुनिता तेलप,निलावती माने, सारिका मोरे,सुवर्णा माने व समाजसेवक दिगंबर आवारे,चंद्रसेन खवले,सुनील तेलप,अविनाश माने,किशोर जगताप, तानाजी मोरे,माणिक आवारे, यांनी पुढाकार घेऊन लहान थोर व सभासदांच्या उपस्थित स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

# गरजू लोकांना कीचनं किट वाटप व मार्गदर्शन शिबीर संपन्न

**बीड (प्रतिनिधी):** बीड शहरातील ताज फंकशन हाल येथे आज दिनांक १० मार्च सोमवारी गरजू लोकांना किचन किट वाटप व विविध योजनाचे मार्गदर्शन शिबीर मा. शेख निजाम यांचे अध्यक्षते खाली वा एम आय एम चे जिल्हा अध्यक्ष शेख शफिक भाऊ,समाज सेवक मुसा खान,मौलाना आझाद मंडळ चे जिल्हा व्यवस्थापक इमरान कादरी सर, नगरसेवक सादेख भाई, सलाम सेट, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजक श्री राजू भाई आणि जुबेर खान होते.

या कर्यक्रमात ५०० कामगार लोकांना किचन सेट वाटप करण्यात आले. तसेच संजय गांधी व श्रवान बाळ योजना चे २०० प्रस्ताव तयार करण्यात आले.मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळं अंतर्गत येणाऱ्या योजना ची माहिती देण्यात आली.या कार्यक्रमात शेख निजाम भाई यांनी लाभार्थीयांना मार्गदर्शन केले.तसेच शफिक भाऊ आणि मुसा खान साहब यांनी राजू भाई व जुबेर खान चे सामाजिक कार्याचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिली. कार्यक्रम यशस्वी करण्या साठी हाफिज अथर साहब,अफसर भाई, तय्याब भाई,साद भाई,आणि सुरईया खान बाजी यांनी परिश्रम घेतले होते



या कार्यक्रमात समाजसेवक मुसाखान पठाण ५०० किचन किट कार्यक्रमात गरजूंना मार्गदर्शन करताना दिसत आहेत.

# पक्ष सोडणार नाही एकजुटीने संघर्ष करू-आ.विजय वडेट्टीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एखाद्या पक्षाच्या हाती चिरकाल सत्ता राहील असे कधीच होत नाही. दिवस पालटतील व पुन्हा आम्ही सत्तेत येऊ. सत्तेसाठी जे पक्ष सोडून गेलेत त्यांची आज काय परिस्थिती आहे. म्हणून मी पक्ष सोडणार नाही आपण सर्व मिळून एकजुटीने संघर्ष करू असे प्रतिपादन राज्याचे माजी विरोधी पक्ष नेते तथा विधिमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रह्मपुरी येथे तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित सत्कार सोहळा व कार्यकर्ता मेळावा प्रसंगी सत्कार मूर्ती म्हणून बोलत होते.आयोजित सत्कार सोहळ्यास गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव कीरसान काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ देविदास जगनाडे, सेवादलाचे गुडेवार गुरूजी, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, बाजार समितीचे सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य डॉ.राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, जिल्हा बँक उपाध्यक्ष यशवंत दिघोरे, माजी पं.स.सदस्य थानेश्वर कायरकर, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष मोंटु पिलारे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे, माजी पं.स.सभापती नेताजी मेश्राम, काँग्रेस माजी शहराध्यक्ष विजय तुमाने, माजी नगराध्यक्षा वनिता ठाकूर, महीला काँग्रेसच्या शहराध्यक्षा योगिता आमले, बाजार समितीच्या उपसभापती सुनीता तिडके, शहर काँग्रेस सचिव पुष्पाकर बांगरे, किसान सेलचे तालुकाध्यक्ष वामन मिसार, मज्जावर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभेत काँग्रेसची सत्ता येईल असे वातावरण असताना लाडकी बहीण व महाविकास आघाडीतील काही उनिवा यामुळे पराभव स्वीकारावा लागला. तर सत्ताधाऱ्यांना सत्तेत आल्यानंतरही विश्वास बसेना अशा परिस्थितीमुळे मिळालेले अनपेक्षित यशाच्या मागे शंका कुशंका आजही व्यक्त केल्या जात आहे. आज सर्वत्र महागाई बेरोजगारी यामुळे संपूर्ण राज्य दिवाळखोरीत निघाले असून राज्यात सत्ताधाऱ्यांकडून प्रचंड लूट सुरू आहे. माझ्या पक्षांतराचा विषय काहींनी प्रसारमध्यमापर्यंत पोहोचविला मात्र हे पूर्णतः खोटे असून काँग्रेस पक्षाने आजवर मला भरभरून दिले आहे म्हणून मी आजही काँग्रेसचा खरा शिपाई म्हणून कार्य करीत आहे व सदैव करीत राहील. मी वारसाने नाही तर संघर्षातून पुढे आलो व राज्याच्या सत्तेत तसेच विरोधी बाका वरून जनसेवा करू लागलो. आज विरोधी बाकाच्या पहिल्या रांगेत बसून मी ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे नाव केले. सत्ता येत जात राहील कुणाचीही सत्ता चिरकाल टिकणार नाही. आपण सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने संघर्ष करावा आम्हीही मूठभर असतानाही एकजुटीने संघर्ष करीत राहू. असे ते यावेळी म्हणाले. तर विदर्भात काँग्रेसच्या जागा कमी होण्यामागे ब्रह्मपुरीत पार पडलेल्या कुणबी समाज मेळाव्यातील काही सारांशाने काँग्रेस पक्षाला क्षती पोहोचविली असे यावेळी विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. पुढे संधी मिळाल्यास आपण लोकसभेसाठी तयारी करणार मी पक्ष सोडून जाणार नाही काळजी करू नका असे भावनिक आव्हानही त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. तत्पूर्वी विधिमंडळ पक्षनेतेपदी नियुक्ती झाल्याबद्दल आमदार विजय वडेट्टीवार यांचा काँग्रेसच्या तालुका, शहर, युवक काँग्रेस महिला काँग्रेस, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्यांक सेल ,व्यापारी संघटना पत्रकार संघ तसेच जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.तर नेहरूंवर टीका करून इतिहास दडवू पाहणारे आजचे केंद्रातील सत्ताधारी हे मोहम्मद अली जिनाचे सहकारी होत व त्यांनी देशासाठी तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी कुठलेही बलिदान केले नाही तर पंडित जवाहरलाल नेहरूंनी देशासाठी तुरुंगवास भोगला. विजय रावांच्या रूपाने मिळालेला आमदाराला माझी पूर्णतः साथ असून ते राज्यात तर मी केंद्रात संघर्ष करून आपणा सर्व कार्यकर्त्यांची आम्ही काळजी घेऊ असे मार्गदर्शनपर बोलताना गडचिरोली चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉक्टर नामदेवराव किरसान म्हणाले.

# उद्योगांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करणार-मंत्री पंकजा मुंडे

## चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न



**मुंबई (प्रतिनिधी):** राज्यामध्ये उद्योगांमधून विविध प्रकारचे प्रदूषण होत असते. प्रदूषण कमी करण्यासाठी शासन उपाययोजना करीत असते. उद्योगांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीच्या अहवालानंतर प्रदूषण कमी करण्यासाठी अधिक प्रभावीपणे उपाययोजना करण्यात येतील. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी नियम ९४ अन्वये उपस्थित केलेले अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषणाबाबत सदस्य सुधीर मुनगंटीवार, सदस्य देवराव भोंगळे यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.

या चर्चेच्या उत्तरात मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रदूषण कमी करण्यासंदर्भात आमदारांची समितीही गठीत करण्यात येईल. चंद्रपूर देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी एक आहे. केंद्र शासनाने चंद्रपूर जिल्ह्यात २१ मार्च २०१२ रोजी नवीन उद्योगांना बंदी करण्यात आली होती. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण पातळी ८३.८८ टक्क्यांवरून ५४ पर्यंत खाली आल्यामुळे केंद्र शासनाने उद्योग बंदी उठवली . त्यानंतर जिल्ह्यात उद्योगांचा विस्तार, नवीन उद्योग वाढीस लागले. राज्यामध्ये स्टील, वस्त्रोद्योग व औष्णिक वीज उद्योगसारख्या अति प्रदूषण करणाऱ्या उद्योग समूहांची उपाय योजनांची बैठक घेण्यात येईल. तसेच अतिप्रदूषण करणाऱ्या उद्योगांची एक वेगळी सूची तयार करण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योग या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील. पर्यावरण विभागाच्या माध्यमातून प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना भेटी देऊन तपासणी करण्यात येत असते. अशा तपासण्याची संख्या वाढवण्यात येईल. अधिवेशन संपल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करून या भागातील परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल. वेकोली कोळसा खाणीबाबत सीएमडी सोबत अधिवेशन काळात बैठक घेण्यात येईल. चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगामुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत कृषी विभागाच्या अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्रदूषण कमी करण्यासाठी कोळशाची वाहतूक ' कन्व्हेअर बेल्टमधून बंद स्वरूपात करावी. कार्बन फॉगरचा उपयोग करण्यात येवून पाण्याची नियमित फवारणी करावी. तसेच वृक्ष लागवड करण्यात यावी, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# नियमबाह्य मुद्रांक विक्री केल्यास परवाना रद्द करणार

**किल्ले धारूर (प्रतिनिधि):** मुद्रांक विक्रेत्यांनी न्यायालयीन फी न्यायालयीन तिकिटाचा साठा ठेवण्यासह मुद्रांक विक्री करत असताना नियमबाह्य प्रकारे मुद्रांक विक्री ची तक्रार आल्यास चौकशीत मुद्रांक विक्रेते दोशी आढळल्यास मुद्रांक परवाना रद्द करण्याची तंबी या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या सध्या ग्रामीण भागात विशेष योजना सुरू आहेत. या योजना पूर्ण करण्यासाठी जी कागदपत्रे जुळवाजुळवी करावी लागते त्यात अनेक ठिकाणी बाँड नागरिक आणि शेतकऱ्यांना नोटरी करून द्यावा लागत आहे. या ठिकाणी शंभर रुपयांच बाँड शासनाने रद्द केलेला असल्याने थेट पाचशे रुपये किमतीचा बाँड खरेदी करावा लागतोय. ५०० चा बाँड खरेदी करत असताना मुद्रांक विक्रेत्यांकडून सर्वसामान्यांना लुटण्याचा प्रकार सुरू आहे. अव्वाच्या सव्वा किमतीला मुद्रांक विक्रेते बाँड विक्री करतात त्यातून सर्वसामान्यांना आर्थिक फटका सहन करावा लागतोय. याबाबत ओरड होतच दुय्यम निबंधक कार्यालय श्रेणी एक कडून मुद्रांक विक्रेत्यांना नोटीस काढून नियमबाह्य पद्धतीने मुद्रांक विक्री करणाराची तक्रार आल्यास चौकशी करून चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्या वर कायदेशीर कारवाई करत मुद्रांक परवाना रद्द करण्यात येणार असल्याची नोटीस कार्यालयाने शहरातील मुद्रांक विक्रेत्यांना काढली आहे. तसेच शहरात अनेक मुद्रांक विक्रेते त्यांना नेमून दिलेल्या जागेवर मुद्रांक विक्री न करता सोयीच्या ठिकाणी बसून मुद्रांक विक्री करत असल्याबाबतही दुय्यम निबंधक कार्यालयाकडे विचारणा केल्यानंतर त्यांनी पुढील दोन दिवसात सर्व माहिती घेऊन उत्तर देणार असल्याचे सांगितले.मुद्रांक विक्रेत्यांनी कोर्ट फी, न्यायालयीन तिकिटाचा उपलब्ध साठा ठेवणे तसेच मुद्रांक विक्री करत असताना सर्व नियम आणि अटीचे पालन करणे बंधनकारक आहे. नागरिकांकडून तक्रार आल्यास तक्रारी त्यानंतर झालेल्या चौकशीतून मुद्रांक विक्रेता दोषी आढळून आल्यानंतर त्याचा परवाना रद्द केला जाईल असे दुय्यम निबंधक बी.डी. गोरे यांनी सांगितले.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील पुढील सुनावणी २६ मार्चला होणार

**बीड (प्रतिनिधी):** बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आज केज जिल्हा आणि सत्र न्यायालयात पहिली सुनावणी झाली. या सुनावणीला संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख देखील न्यायालयात उपस्थित होते.सुरक्षेच्या कारणास्तव सर्व आरोपी व्हीसीद्वारे कोर्टात उपस्थित होते. यावेळी बचाव पक्षाकडून डिजिटल पुराव्यांच्या सीडीआरची मागणी करण्यात आली.



आरोपीचे जबाब मिळाले नसल्याचा युक्तिवाद आरोपीचे वकील राहुल मुंडेंनी केला. यानंतर वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे यांनी बाजू मांडली. सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी देखील युक्तिवाद केला.२६ मार्चला सरकारी पक्ष आपले म्हणणे मांडेल, असं सांगण्यात आले. यानंतर न्यायालयाने संतोष देशमुख हत्या प्रकरणातील पुढील सुनावणी २६ मार्चला होणार असल्याचे सांगितले.सुनावणी झाल्यानंतर वाल्मिक कराडचे वकील काय म्हणाले ?– न्यायालयात सुनावणी झाल्यानंतर वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे यांनी ब्लॅक गॉगल लावून माध्यमांशी संवाद साधला.न्यायालयात या कामाचं दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. त्या दोषारोप पत्रात बरेच कागदपत्रे आहे, ते आरोपींना मिळणं गरजेचं आहे, असं वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे म्हणाले.कागदपत्रे मिळण्याबाबत आज आम्ही मागणी केली आहे, ते पुढच्या सुनावणीमध्ये मिळतील, असं वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे यांनी सांगितले. वाल्मिक कराडने वकील बदलला– संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या पहिल्या सुनावणीला उज्वल निकम उपस्थित नव्हते. आज सरकारी पक्षाकडून सहाय्यक सरकारी वकील बाळासाहेब कोल्हेंनी सरकार पक्षाकडून बाजू मांडली. तर संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये वाल्मिक कराडची बाजू विकास खाडे यांनी मांडली. आतापर्यंत अशोक कवडे हे वाल्मिक कराडचे वकील म्हणून काम पाहत होते. मात्र यापुढे कोल्हापूर येथील वकील विकास खाडे हे वाल्मिक कराडचे काम पाहणार आहेत.

# वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई

**गेवराई (प्रतिनिधी):** तालुक्यातील कोल्हेर येथे (इशशव ेश्रिळलश विनापरवाना ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती असल्याची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी (दि. ११) मंगळवार रोजी पहाटे कारवाई करत ९,५३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




सविस्तर माहिती अशी कि, मागील काही दिवसांपासून (इशशव) जिल्हाभरात अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेवराई तालुक्यातील कोल्हेर येथे ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैध वाळू वाहतूक करताना अज्ञात चालक व ट्रॅक्टर मालक स्वप्नील वाडकर यांच्यावर गेवराई पोलिसांनी (दि. ११) मंगळवार रोजी पहाटे कारवाई केली. यात स्वराज कंपनीचा ७४४ मॉडेल विना नंबरचा ट्रॅक्टर व केशरी रंगाची विना नंबरची ट्रॉली एकूण अंदाजे किंमत ९,५०,००० व ट्रालीमधील वाळूची अंदाजे किंमत ३००० असा एकूण ९,५३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ट्रॅक्टर चालक पोलिसांना पाहून ट्रॉलीतील वाळू खाली ओतून ट्रॅक्टर सोडून पसार झाला. अधिक तपास गेवराई पोलीस करत आहेत.

# चौसाळा महाविद्यालयात स्व.यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

**चौसाळा (विवेक कुचेकर):** कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना व मराठी विभागातर्फे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, देशाचे माजी संरक्षण मंत्री तथा साहित्यप्रेमी स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. स्व. यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये मोठे योगदान असून त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हटले जाते. सहकाराच्या माध्यमातून विकासाचे नवे पर्व त्यांनी महाराष्ट्रात सुरू केले असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलासराव भिलारे यांनी व्यक्त केले तर मराठी विभाग प्रमुख प्रा. सुधीर माने म्हणाले की स्व. यशवंतराव चव्हाण साहित्याचे व्यासंगी होते त्यांनी विपुल लेखन केले. लेखक, कवी, नाटककार अशा साहित्यिकांना त्यांनी उदार राजकीय आश्रय दिला ते समाजकारण राजकारण व साहित्याच्या प्रांतात सुद्धा रमत असत कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉक्टर अमर आलधे प्रा. डॉक्टर संजय कदम यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्रासह परराज्यातील कृषी संशोधन केद्र,ऐतिहासिक स्थळांना दिल्या भेटी

## ६ दिवसाच्या सहलींमध्ये ३७५ विद्यार्थ्यांचा सहभाग आदित्य शिक्षण संस्था बीडच्या महाविद्यालयाचा राज्यस्तरीय शैक्षणिक दौरा

**बीड (प्रतिनिधी):** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत व आदित्य शिक्षण संस्था बीड संचलित आदित्य कृषी महाविद्यालय बीड येथील बी. एस्सी. कृषी पदवीच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचा राज्यस्तरीय शैक्षणिक सहलीचा अभ्यास दौरा संपन्न झाला. या दरम्यान विद्यार्थ्यांनी राज्यातील राष्ट्रीय पातळीवरील नामांकित कृषी संशोधन केंद्र, संशोधन संस्था याबरोबरच ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी तेथील शैक्षणिक माहिती संकलित केली. या ६ दिवसाच्या सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

सदरील सहलीचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा यांच्या नियोजनाखाली पाचव्या अधिष्ठाता समन्वय समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना शक्तीला पुरेशी संधी उपलब्ध करून देणे आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजवणे अशा उदात्त हेतुने या शैक्षणिक सहलीचे आयोजन २४ फेब्रुवारी १ मार्च २०२५ दरम्यान करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.या शैक्षणिक सहलीच्या प्रथम चरणामध्ये राज्यातील कृषी संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, राष्ट्रीय स्तरावरील नामांकित कृषी व कृषी संलग्नित क्षेत्रामध्ये कार्यरत कंपन्या ना भेट देऊन माहिती घेतली. तसेच ऐतिहासिक महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला, विविध सागरी किनारे, कृषी महाविद्यालये ई. ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संपादित केली. सदरील शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून सहलीत सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनींना



कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उद्यमशीलता, उद्योग व्यवसाय, हंगामानुसार पीक उत्पादन, उपलब्ध बाजारपेठा इत्यादी विविध कृषि क्षेत्रातील तांत्रिक मार्गदर्शन व माहिती प्राप्त करून घेतली. या सहलीच्या नियोजन व आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा, डॉ. हिमांशू श्रीवास्तव, प्रा.बालाजी बहिरवाल, डॉ. पी डी खेडकर, प्रा. व्ही बी शिंदे, प्रा. के एस पवार, प्रा. माया शिंदे, प्रा. गव्हाणे, प्रा. पवार, राऊत, अशोक पवार यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा , प्रा. बालाजी बहिरवाल व सर्व प्राध्यापक यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.शैक्षणिक सहलीच्या द्वितीय चरणामध्ये विद्यार्थ्यांनी गोव्यातील राष्ट्रीय सागर संशोधन संस्था, पणजी, विविध सागरी किनारे, मंगेश टेम्पल, विविध चर्च, क्रूज इत्यादी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व मनोरंजन ठिकाणी भेटी देवून तेथील शैक्षणिक माहिती संकलित केली.शैक्षणिक सहलीच्या शेवटच्या टप्प्यात महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण च्या निसर्गरम्य ठिकाणी भेट देऊन तज्ञ प्रशिक्षकामार्फत विद्यार्थ्यांनी पाण्यातील वेगवेगळ्या राइट्स त्यामध्ये बनाना राईड, बंपर राईड चा आनंद घेऊन बोटिंग मधून मालवण च्या निसर्गाने नटलेल्या खाडीतून हाऊस बोट, पाण्यातील विठ्ठल मंदिर, देवबाग बीच, तूसुनामी आयलँड, गोल्डन रॉक, लाईट हाऊस इत्यादी विविध ठिकाणाचा १४ किलोमीटरचा प्रवास बोटीतून करून सर्व मालवणचा आनंद घेतला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रसिद्ध असा पाण्याणी वेढलेला सिंधुदुर्ग किल्ल्याला विद्यार्थ्यांनी बोटीद्वारे भेट देऊन सिंधुदुर्ग किल्ल्याची पूर्ण माहिती संकलन करून गडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे दर्शन घेऊन गडावर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज याच्या पायाच्या ठशाचे दर्शन घेऊन किल्ल्याची विद्यार्थ्यांनी पाहणी केली. आणि सदरील किल्ल्याचे महत्त्व जाणून घेतले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077